**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 16.03.2025** **वार-रविवार**

---

**तुकारामबीज**

जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांच्या 375वा बीज सोहळा आज देहूनगरीमध्ये अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी राज्यभरातून दिंड्या देहूमध्ये दाखल झाल्या असून इंद्रायणी नदीचा काठ वारक-यांच्या गर्दीने फुलून गेला आहे. आज पहाटे तीन वाजता काकड आरती झाली, त्यानंतर शीळा मंदीर महापूजा, पालखीचं वैकुंठस्थान मंदीराकडे प्रस्थान, आणि कीर्तन झाल्यावर मुख्य मंदीरात पालखीचं आगमन झालं. यावेळी टाळ-मृदुंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकोबाचा जयघोषानं परिसर दुमदुमून गेला होता.

**शिंदेपुरस्कार**

जगद्गुरु श्री तुकारामांच्या वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज वारकरी संप्रदायातील सर्वश्रेष्ठ जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान करण्यात आला. तुकाराम महाराजांची प्रतिमा, सन्मानपत्र, पगडी, चिपळ्या, तुकाराम गाथा असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. पंढरपूर वारी दरम्यान वारकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या विशेष सुविधा आणि निर्मल वारी हरित वारी या संकल्पनेसाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संत तुकोबांनी जगण्याचं तत्त्वज्ञान अभंगाच्या माध्यमातून सोप्या भाषेत सांगितलं; या संतांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचं आणि  कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचं काम वारकरी संप्रदाय करत असल्याचं एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. मराठी भाषेला आता जरी अभिजात दर्जा मिळाला असला तरी संत तुकारामांनी 400 वर्षांपूर्वी क्लिष्ट असं तत्त्वज्ञान साध्या सोप्या मराठीत आणलं आणि या भाषेला अभिजात केलं, असं उपमुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून संतांच्या रक्षणासाठी कायम तत्पर असल्याचं त्यांनी सांगितलं.

इंद्रायणी, गोदावरी आणि चंद्रभागा या प्रदूषित झालेल्या नद्यांविषयी खंत व्यक्त करत या नद्या स्वच्छ करण्यासाठी लोक चळवळ उभी राहिली पाहिजे अशी अपेक्षाही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे दिंड्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत पुनरुच्चार केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भंडारा डोंगर पायथ्याशी आयोजित गाथा पारायण सोहळ्यालाही भेट दिली. भंडारा डोंगरावरील मंदीराच्या उभारणीसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही शिंदे यांनी दिली.

**राजेंद्रभोसले**

पुणे महापालिकेतील चालू आर्थिक वर्षाची विकासकामांची देयकं येत्या २४ मार्चपर्यंतच सादर करा; अन्यथा विभागप्रमुख जबाबदार राहतील असा इशारा पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी दिला आहे. आर्थिक वर्ष ३१ मार्चला संपत आसतानाही महापालिकेच्या विविध विभागांकडून अखेरच्या दिवसापर्यंत कामाची देयकं सादर केली जातात. यामुळे मार्च महिन्यात प्रमाणापेक्षा जास्त खर्च झालेला दिसतो. हे प्रकार बंद करण्यासाठी ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेच्या मिळकत कर विभागाला आतापर्यंत २ हजार १५४ कोटी रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे. मिळकत कर विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी २ हजार ३९५ कोटी रुपयांचं उद्दिष्ट देण्यात आलं होतं, हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महापालिकेनं थकबाकी वसुलीकरता विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने सिमला मिरची, शेवगा, कोबी आणि फ्लॉवर यांच्या भावात घसरण झाली तर मटार आणि हिरवी मिरची महागली. पालेभाज्यांचे भाव या आठवड्यात घसरले आहेत. डाळिंब स्ट्रॉबेरी आणि पपईचे दर खाली आले आहेत. फुल बाजारात आवक आणि मागणी टिकून असल्याने दर स्थिर आहेत.

निधन-**<u>प्रतापजाधव</u>**

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र सायकलिंग संघटनेचे अध्यक्ष प्रताप जाधव यांचं आज पहाटे पुण्यात अकस्मिक निधन झालं; ते 68 वर्षांचे होते. भारतीय सायकलींग क्षेत्रात मानाचा आणि सर्वोच्च समजला जाणारा जीवनगौरव पुरस्कार नुकताच त्यांना नवी दिल्लीत प्रदान करण्यात आला. शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रताप जाधव यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडूही घडवले. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत त्यांना दोन वेळा पदके मिळवली. संघटक म्हणून आपल्या चाळीस वर्षाच्या काळात त्यांनी वीस राष्ट्रीय स्पर्धांचं आयोजन केलं.

**<u>निधन</u>**

प्रसिद्ध कवी-गज़लकार आणि सनदी लेखापाल राजेंद्र शहा यांचं काल पुण्यात अल्प आजारानं निधन झालं; ते ६३ वर्षांचे होते.  गेल्या चार दशकांपासून काव्य लेखनाच्या प्रांतात कार्यरत असलेल्या शहा

यांनी विविध कविसंमेलन आणि गज़ल मुशायरामध्ये सहभाग घेतला होता. साहित्यदीप प्रतिष्ठानचा गज़लदीप पुरस्कार, नाशिकच्या कलायतन संस्थेचा बालकवी पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३९ तर किमान तापमान 18 पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**